**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम**

नैसर्गिक परिस्थितीमुळे दूरवरुन पाणी आणावे लागल्याने होणा-या देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी गरजू ग्राम पंचायतींना व जिल्हा परिषदांना **देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान** देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक ग्रापापु-१००३/प्र.क्र. २५६/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १२ ऑक्टोबर, २००६**

**वाचा :-** शासन निर्णय, पा.पु. व स्व. वि. क्रमांक ग्रापापु-१००३/प्र.क्र. २५६/पापु-०७, दिनांक १० जुलै, २००६

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नैसर्गिक परिस्थितीमुळे दूरवरुन पाणी आणावे लागल्याने होणा-या देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी गरजू ग्राम पंचायतींना व जिल्हा परिषदांना **देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान** देण्याबाबतचा निर्णय संदर्भिय शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आला असून, त्या शासन निर्णया सोबत जोडण्यात आलेल्या **परिशिष्ट-१** व **परिशिष्ट-३** मध्ये अनुक्रमे स्वतंत्र व प्रादेशिक योजनेस हे देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठीची पात्रता व त्यांनी पूर्ण करावयाच्या अटी देण्यात आल्या आहेत. त्यामधील अटीनुसार हे अनुदान मागणी करताना लगतच्या वर्षात स्वतंत्र व प्रादेशिक योजनासाठी आकारण्यात आलेल्या एकूण पाणीपट्टीच्या रकमेपैकी किमान ५० % वसूली होणे आवश्यक आहे.

२. या संदर्भात सर्व जिल्हयांकडून माहिती मागविली असता असे निदर्शनास आले आहे की, स्वतंत्र व प्रादेशिक योजनांच्या पाणीपट्टीकरीता प्रोत्साहन अनुदान मागणी करताना लगतच्या वर्षात आकारण्यात आलेल्या एकूण पाणीपट्टीच्या रकमेपैकी ५० % एवढी वसूली झालेली नसल्याने बहुतांश स्वतंत्र व प्रादेशिक योजना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान मिळण्यासाठी पात्र ठरत नाहीत. म्हणून जिल्हा परिषदांनी चालू आर्थिक वर्षाकरीता पाणीपट्टी वसूलीची ५० % ची घालण्यात आलेली अट काही प्रमाणात शिथिल करण्याची विनंती केली आहे. या विनंतीचा विचार करुन ही अट चालू आर्थिक वर्षासाठी शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन संदर्भिय शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत नैसर्गिक परिस्थितीमुळे दूरवरुन पाणी आणावे लागल्याने होणा-या देखभाल दुरुस्ती खर्चाची काही प्रमाणात प्रतिपूर्ती करण्यासाठी गरजू ग्राम पंचायतींना व जिल्हा परिषदांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी संदर्भिय शासन निर्णयासोबत जोडण्यात आलेल्या **परिशिष्ट- १** व **परिशिष्ट- ३** मधील अनुक्रमे स्वतंत्र व प्रादेशिक योजनेस हे देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठीची पात्रता व पूर्ण करावयाच्या अटी देण्यात आल्या आहेत. या अटींमधील आकारण्यात आलेल्या पाणीपट्टीची लगतच्या वर्षाची वसूली ५० % असावी अशी घातलेली अट **फक्त चालू आर्थिक वर्षाकरीता (म्हणजे सन २००६-०७ करीता) देय असलेल्या देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानासाठी ३० % पर्यंत शिथिल करण्यास शासन मंजुरी देत आहे.**

२. चालू आर्थिक वर्षाकरीता **(म्हणजे सन २००६-०७ करीता)** देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठी सन २००५-०६ या आर्थिक वर्षात आकारण्यात आलेल्या पाणीपट्टीची वसूली किमान ३० % झालेली असावी. सन २००७-०८ या आर्थिक वर्षा पासून पुढे देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठी आकरण्यात आलेल्या एकूण पाणीपट्टीच्या रकमेपैकी किमान ५० % वसूली होणे ही अट राहील.

३. त्यामुळे, वरील सुधारित निकषानुसार सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठी पात्र असलेल्या जिल्हयातील सर्व स्वतंत्र व प्रादेशिक योजनांचे अनुदान मागणीचे प्रस्ताव या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात भरुन या विभागाकडे **दिनांक १०.११.२००६** पर्यंत पाठविण्याची व्यवस्था करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६१०१२१५४२०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व ) यांचे खाजगी सचिव



८९४

मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, (सर्व)
मा. मुख्य सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
प्रकल्प अधिकारी, आपलं पाणी प्रकल्प, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
तहसीलदार (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग
संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग



८९५

## विवरणपत्र-२

जिल्हा :-

(जिल्हयातील सर्व स्वतंत्र योजनांची एकत्रित माहिती)

| अ.क्र. | जिल्हयातील एकूण स्वतंत्र योजनांची संख्या | या स्वतंत्र योजनेत समाविष्ट एकूण गावे / वाडयांची संख्या | या स्वतंत्र योजनेत समाविष्ट एकूण लोकसंख्या (सन २००१ च्या जनगणनेनुसार) | सपाट भुपृष्ठभागात गावठाणापासून १.६ कि.मी. पेक्षा अधिक दुरुन अथवा डोंगराळ भागात १०० मिटर्स पेक्षा जास्त उंचीवरुन पाणी आणावे लागत असलेल्या योजनांची संख्या | रकाना ५ मधील योजनांमध्ये समाविष्ट एकूण लोकसंख्या (सन २००१ च्या जनगणनेनुसार) | रकाना ५ मधील योजनांपैकी हस्तांतरीत योजनांची संख्या | रकाना ५ मधील योजनांपैकी अहस्तांतरीत योजनांची संख्या | रकाना ५ मधील योजनांवर आकारण्यात आलेली पाणीपट्टी | रकाना ५ मधील योजनांमधील मागील वर्षाची पाणीपट्टीची | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | एकूण मागणी | प्रत्यक्ष वसूली | वसूलीची टक्केवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,

८९५

## विवरण पत्र-१

जिल्हा (जिल्हयातील सर्व प्रादेशिक योजनांचा गोषवारा) (प्रादेशिक योजना)

| जिल्हयातील एकूण प्रादेशिक न.पा.पु. योजनांची संख्या | या प्रादेशिक योजनांमध्ये समाविष्ट एकूण गावे/वाडयांची संख्या | या प्रादेशिक योजनेत समाविष्ट एकूण लोकसंख्या (सन २००१ च्या जनगणनेनुसार) | आकारण्यात आलेली एकूण पाणीपट्टी | | मागील वर्षाची पाणीपट्टीची | | | हस्तांतरीत योजनांची संख्या | अहस्तांतरीत योजनांची संख्या | जि.प. मार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असलेल्या योजनांची संख्या | जि.प. मार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असलेल्या योजनांची मागील वर्षाची पाणीपट्टीची | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | घरगुती नळजोडणी | सार्वजनिक नळजोडणी | एकूण मागणी | प्रत्यक्ष वसुली | वसूलीची टक्केवारी | | | | एकूण मागणी | प्रत्यक्ष वसुली | वसुलीची टक्केवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,

## विवरणपत्र-१ (पुढे चालू)

जिल्हा- (जिल्हयातील सर्व प्रादेशिक योजनांचा गोषवारा) (प्रादेशिक योजना)

| म.जी.प्रा. मार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात असलेल्या योजनांची संख्या | म.जि.प्रा. मार्फत देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असलेल्या योजनांची मागील वर्षाची पाणीपट्टीची | | | जिल्हयातील सर्व प्रादेशिक योजनांसाठी एक समान पूल दर ठरविण्यात आला आहे काय ? | असल्यास हा दर किती आहे ? | जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी गठित करण्यात आला आहे काय ? | असल्यास यामध्ये नियमानुसार रकमा जमा करण्यात येत आहेत काय ? | प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठी जिल्हा परिषदेने आवश्यक ठराव केला आहे काय व त्या ठरावाची प्रत सोबत जोडली आहे काय ? | या ठरावानुसार पाणी पट्टीमध्ये दरवर्षी ठराविक दराने वाढ करण्याचे व पुढील पाच वर्षात पाणीपट्टीची आकारणी व वसूली योजनेच्या देखभाल व दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणात करण्याचे ठरविण्यात आले आहे काय ? | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण मागणी | प्रत्यक्ष वसूली | वसूलीची टक्केवारी | | | | | | | |
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,

विवरणपत्र-२ (पुढे चालू)

जिल्हा :- (जिल्हयातील सर्व स्वतंत्र योजनांची एकत्रित माहिती)

| रकाना ५ मधील योजनांमध्ये मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ च्या सुधारित कलम ४९ नुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती गठित करण्यात आली आहे काय ? | रकाना ५ मधील योजनांमध्ये शासन अधिसूचना दि. २२.९.९७ नुसार ग्राम पाणी पुरवठा निधीचे स्वतंत्र खाते उघडण्यात आले आहे काय ? | असल्यास यामध्ये नियमानुसार रकमा जमा करण्यात येत आहेत काय ? | प्रोत्साहन अनुदान प्राप्त होण्यासाठी ग्राम सभेने आवश्यक ठराव केला आहे काय ? | या ठरावानुसार पाणी पट्टीमध्ये दरवर्षी ठराविक दराने वाढ करण्याचे व पुढील पाच वर्षात पाणीपट्टीची आकारणी व वसूली योजनेच्या देखभाल व दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणात करण्याचे ठरविण्यात आले आहे काय ? | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,

८२३